22 MAY 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# 'कॉमेलिनेसी ऑफ इंडिया' संशोधकांसाठी महत्त्वाचा ठेवा

## डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठात संदर्भग्रंथाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'कॉमेलिनेसी ऑफ इंडिया' संदर्भग्रंथ वनस्पतीशास्त्राच्या संशोधकांसाठी महत्त्वाचा ठेवा आहे. अशाप्रकारचे संशोधन व संदर्भसंचय आपल्या हातूनही व्हावा, यासाठीची प्रेरणा वनस्पतीशास्त्राच्या अभ्यासक व संशोधकांनी यापासून घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी केले.

विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजाराम गुरव आणि डॉ. मयूर नंदीकर यांनी अनेक वर्षांच्या परिश्रमातून संयुक्तपणे सिद्ध केलेल्या 'कॉमेलिनेसी ऑफ इंडिया' अर्थात 'केना कुळातील भारतीय वनस्पती' या संदर्भग्रंथाचे प्रकाशन अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात नुकतेच झाले. त्यावेळी डॉ. शिर्के बोलत होते. एमेरिटस संशोधक प्राध्यापक डॉ. एस. आर. यादव आणि पुण्यातील आघारकर संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. रितेश कुमार चौधरी यांच्या हस्ते ग्रंथाचे अनावरण करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठात 'कॉमेलिनेसी ऑफ इंडिया' या संदर्भग्रंथाचे प्रकाशन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. मयूर नंदीकर, डॉ. रितेश कुमार चौधरी, डॉ. एस. आर. यादव आणि डॉ. राजाराम गुरव उपस्थित होते.

डॉ. चौधरी म्हणाले, या परिसरातील संशोधनामध्ये मलाही काही वाटा उचलता आला, याचे समाधान वाटते.

डॉ. मयूर नंदीकर यांनी संदर्भग्रंथाची प्रस्तुतता आणि त्याचा प्रकाशनापर्यंतचा १५ वर्षांचा प्रवास सांगितला. ते म्हणाले, पुण्यातील पारंबी प्लांट रिसर्च अँड एज्युकेशन फाउंडेशनने प्रकाशित केलेल्या या ग्रंथात आफ्रिका आणि आग्नेय आशियातील १३१ प्रजातींसह भारतातील कोमेलिनेसी कुटुंबातील विविध प्रजातींची टीपांसह माहिती दिली आहे.

डॉ. राजाराम गुरव यांनी या ग्रंथाच्या निर्मिती प्रक्रियेविषयी माहिती दिली. ते म्हणाले, १८७९ मध्ये ब्रिटिश अभ्यासक आल्फ्रेड यंग यांनी पश्चिम महाराष्ट्रातून या प्रजातींमधील काहींचे संकलन केले होते. त्यांची माहिती ब्रिटिश म्युझियममध्ये होती. ही माहिती कधीही प्रकाशात आली नव्हती. डॉ. मनोज लेखक यांनी स्वागत केले, तर डॉ. घाणे यांनी आभार मानले.

22 MAY 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दहशतवाद, हिंसाचारविरोधी दिनाची शपथ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यात आला.

दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी आणि अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचविणे, देशासाठी व दहशतवादाविरोधात लढणाऱ्या सैनिकांच्या त्याग व बलिदानाचा सन्मान करणे हा हेतू आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील लॉनमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगले, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आयक्यूएसी संचालक डॉ. सागर डेळेकर, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर आदी उपस्थित होते. विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक अमोल कुलकर्णी यांनी सर्वांना शपथ दिली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील लॉनमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत शिक्षक, विद्यार्थी.**



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात दहशतवाद, हिंसाचारविरोधी दिन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यात आला. दहशतवाद व हिंसाचारविरोधी पाळण्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी आणि अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचवणे, देशासाठी व दहशतवादाविरोधात लढणाऱ्या सैनिकांच्या त्याग व बलिदानाचा सन्मान करणे. भावी पिढीच्या मनात देशाच्या प्रगतीसाठी व संरक्षणाप्रति जागरूकता निर्माण करणे हा हेतू आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील लॉनमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेण्यात आली. विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक अमोल कुलकर्णी यांनी सर्वांना शपथ दिली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. तानाजी चौगले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर, अधिकारी, कर्मचारी व तंत्रज्ञान अधिविभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.



22 MAY 2024
पुढारी

# ५०५ अभ्यासक्रमांचे आजअखेर निकाल जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ५०५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

विद्यापीठातर्फे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. दि. २१ रोजी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ ॲग्रिकल्चर, मास्टर ऑफ लॉ, मास्टर ऑफ एज्युकेशन, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला २,०५९ विद्यार्थी बसले. पैकी १७७ विद्यार्थी अनुपस्थित होते. २१ रोजी एम.ए. (सायकॉलॉजी), एम.एस्सी. (फूड टेक्नॉलॉजी), एम.एस्सी. (फूड सायन्स अँड न्यूट्रीशन), एमसीए, बीए आदी १७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. कोल्हापूर जिल्ह्यातून दोन गैरप्रकारांची नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. जाधव यांनी दिली.

22 MAY 2024

सकाळ

# विद्यापीठ, गार्डन क्लबतर्फे बागकामाचा मोफत कोर्स

कोल्हापूर : गार्डन्स क्लब व शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे बागकामाचा मोफत कोर्स घेण्यात येणार आहे. यामध्ये बागकामाची प्राथमिक माहिती दिली जाणार आहे. गुरुवार (ता. २३) व शुक्रवार (ता. २४) दुपारी तीन ते पाच यावेळेत हा कोर्स शिकविण्यात येईल. या दोन दिवसांच्या क्रॅश कोर्ससाठी नाव नोंदणी आवश्यक असून, गार्डन क्लबशी संपर्क साधण्याचे आवाहन क्लबच्या अध्यक्षा पल्लवी कुलकर्णी व आजीवन अध्ययनचे विभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार यांनी केले. अभ्यासक्रमाला प्रवेशासाठी समन्वयक डॉ. प्रमिला बत्तासे यांच्याशी संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून बागकामावर मोफत क्रॅश कोर्स

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गार्डन्स क्लब व शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बागकामावर २३ व २४ मे रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत दोन दिवसीय मोफत क्रॅश कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे.

वळवाचे शिंतोडे पडून गेले की, हवेत गारवा व हिरवळ जाणवायला लागते. झाडे लावण्यासाठी सगळ्यांची लगबग चालू होते. बाजारात, नर्सरीत, हायवेवर, सगळीकडील रोपे खुणावू लागतात. हा बागकामाची प्राथमिक माहिती देणारा दोन दिवसाचा कोर्स असणार आहे. कोर्ससाठी नावनोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहिती व नोंदणीसाठी गार्डन्स क्लबच्या अध्यक्षा पल्लवी कुलकर्णी व आजीवन अध्ययनचे विभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात २७ पासून रोबोक्स प्रशिक्षण शिबिर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व आरएनटी रोबोटिक्स, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने व एसयूके रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या सहकार्याने सोमवार दि. २७ मे ते ०१ जून या कालावधीत रोबोटिक्स प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिर १२ वर्षावरील शालेय विद्यार्थ्यांकरिता असून, सकाळी ११ ते २ या वेळेत होणार आहे. आधुनिक जगाच्या स्पर्धेत टिकून राहायचे असल्यास रोबोटिक्ससारख्या विषयाची माहिती असणे आवश्यक आहे. बेसिक इलेक्ट्रॉनिक्स, रोबोटिक्स, ३- डी डिझायनिंग व प्रिटिंग विषयावर आरएनटी रोबोटिक्सच्या तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व प्रात्यक्षिक होणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन नवोन्मेष उपक्रमाचे संचालक प्रा. एस. डी. डेळेकर यांनी केले आहे.

22 MAY 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कॉमेलिनेसी ऑफ इंडिया' संशोधकांसाठी महत्त्वाचा ठेवा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; शिवाजी विद्यापीठात डॉ. गुरव, नंदीकर यांच्या ग्रंथाचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : 'कॉमेलिनेसी ऑफ इंडिया' हा संदर्भग्रंथ वनस्पतीशास्त्राच्या भावी संशोधकांसाठी एक महत्त्वाचा ठेवा आहे. अशा प्रकारचे संशोधन व संदर्भसंचय आपल्या हातूनही व्हावा. त्यासाठीची प्रेरणा वनस्पतीशास्त्राच्या अभ्यासक, संशोधकांनी यापासून घ्यावी', असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजाराम गुरव आणि डॉ. मयूर नंदीकर यांच्या 'कॉमेलिनेसी ऑफ इंडिया' अर्थात 'केना कुळातील भारतीय वनस्पती' या संदर्भग्रंथाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहातील या कार्यक्रमात संशोधक प्रा. डॉ. एस. आर. यादव, पुण्यातील आघारकर संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. रितेश कुमार चौधरी यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'डॉ. गुरव आणि नंदीकर यांच्या समर्पणवृत्तीमुळेच वनस्पतीशास्त्राच्या एका शाखेमधील महत्त्वाचा संदर्भग्रंथ साकार झाला. त्यांच्या कार्यांची जाणीव ठेवून नवसंशोधकांनी आपल्या संशोधनकार्याला दिशा द्यावी.'

डॉ. चौधरी म्हणाले, 'विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी वनस्पतीशास्त्राच्या संशोधनात, विशेषतः पश्चिम घाटावरील वनस्पतींच्या वेगवेगळ्या प्रजातींविषयी संशोधन, संवर्धन या अनुषंगाने मोलाचे योगदान दिले आहे. या परिसरातील संशोधनामध्ये मलाही काही वाटा उचलता आला, याचे समाधान वाटते.'

डॉ. नंदीकर यांनी ग्रंथात आफ्रिका आणि आग्नेय आशियातील १३१ प्रजातींसह भारतातील कोमेलिनेसी कुटुंबातील विविध प्रजातींची टीपांसह माहिती दिली असल्याचे सांगितले. डॉ. गुरव यांनी सन १८७९ मध्ये ब्रिटिश अभ्यासक आल्फ्रेड यंग यांनी पश्चिम महाराष्ट्रातून या प्रजातींमधील काहींचे संकलन केले होते आणि त्यांची माहिती ब्रिटिश म्युझियममध्ये होती. डॉ. नंदीकर यांच्या संशोधनाद्वारे आणि आता या ग्रंथाद्वारे ती माहिती वनस्पतीशास्त्रांना उपलब्ध झाली असल्याचे सांगितले. डॉ. मनोज लेखक यांनी स्वागत केले. डॉ. घाणे यांनी आभार मानले.

### ग्रंथाची वैशिष्ट्ये ...

- प्रख्यात ब्रिटिश वनस्पतीशास्त्रज्ञ सी. बी. क्लार्क यांच्या १८८१ मधील कॉमेलिनेसीवरील मोनोग्राफनंतरचे महत्त्वाचे ठळक कार्य, १२ नवीन नावे आणि प्रजाती, १३ नवीन समानात्म प्रजाती, १०८ द्विपदींचे वर्गीकरण, १३१ नावांसाठी ५१६ द्विपदींची नोंद, केना कुळातील वनस्पती त्यांची प्रदेशनिष्ठता आणि ओळख, गुणसूत्रांची संख्या निश्चितीकरण, १०० पेक्षा जास्त रेखाचित्रे आणि छायाचित्रे, आदी या ग्रंथाची वैशिष्ट्ये आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'कॉमेलिनेसी ऑफ इंडिया' या संदर्भग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत (डावीकडून) डॉ. मयूर नंदीकर, रितेश कुमार चौधरी, एस. आर. यादव, राजाराम गुरव.